# धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________________ दिनांक : १०/०२/२०१६

प्रसिध्दीकरिता

## लोकमान्य नगरमधील समाजकंटकांवर कारवाई करा !
## 'धर्मराज्य पक्षा'चे सहाय्यक पोलिस आयुक्तांना निवेदन

ठाणे (प्रतिनिधी), दि. १० - वर्तकनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लोकमान्य नगर आणि सावरकर नगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून सराफांची दुकाने लुटणे व दिवसाढवळ्या चोऱ्या होण्याची प्रकरणे घडत असून, यामुळे स्थानिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भर रस्त्यात महिला आणि मुलींची छेडछाड होणे, अश्लील हावभाव करणे यासारखे प्रकार सर्रासपणे घडत असल्याने **'धर्मराज्य पक्ष'** याबाबत आता आक्रमक झाला असून, संबंधित समाजकंटकांवर त्वरित कारवाई व्हावी, यासाठी पक्षाचे लोकमान्यनगर प्रभाग अध्यक्ष महेश क्षिरसागर यांनी पक्षाच्या कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्यासोबत ठाण्याचे सहाय्यक पोलिस आयुक्त दिलीप गोरे यांची भेट घेऊन, या प्रकरणी कठोर कारवाई करावी, अशा आशयाचे निवेदन त्यांना सादर केले.

दरम्यान, गेली अनेक दिवस लोकमान्यनगर परिसरासोबतच, सावरकरनगर आणि लकडीपूल मार्केट या विभागातदेखील गर्दुल्यांचा वावर वाढला असून, यात गुंड प्रवृत्तीच्या तरूणांचा मोठया प्रमाणात समावेश आहे. याप्रकरणी वर्तकनगर पोलिस ठाण्यात वारंवार तक्रारी देऊनही समाजकंटकांवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसल्याने, परिसरात कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा धोका निर्माण झालेला आहे. म्हणूनच, लोकमान्यनगर आणि सावरकरनगर परिसरात रात्रीच्या वेळेस पेट्रोलिंगमध्ये वाढ करून, गुंडांचा त्वरित बिमोड करावा, अशी मागणी सहाय्यक पोलिस आयुक्तांकडे करण्यात आली आहे. यादरम्यान, **'धर्मराज्य पक्षा'**चे उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर, **'धर्मराज्य महिला संघटने'**च्या सचिव साक्षी शिंदे, सदस्या स्वप्नाली पवार तसेच, पांडूरंग जाधव यांच्यासहित पक्षाचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

-----@@@-----

ए/एर०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस्
को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२,
ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग,
द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०.
दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*"सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!"...*